| MHBI100000822026 | दिवाणी किरकोळ अर्ज क्र.१६/२०२६ |
|---|---|
| | कविता कमलाकर शिंदे व इतर<br>- विरुध्द -<br>निरंक |

## निशाणी क्र.१ वरील आदेश

प्रस्तूतचा अर्ज अर्जदार यांनी महाराष्ट्र रेग्युलेशन ॲक्ट VIII, १८२७ मधील कलम २ प्रमाणे दाखल केलेला आहे.

२. अर्जदाराचे कथन आहे की, मयत कमलाकर सुदामराव शिंदे हे दिनांक ०३.११.२०२५ रोजी स्वामी रामानंद तिर्थ ग्रामीण रुग्णालय, अंबाजोगाई येथे मयत झालेले आहेत. अर्जदार क्र.१ ही मयताची पत्नी असुन अर्जदार क्र.२ व ३ ही मयताची मुले आहेत. मयत कमलाकर सुदामराव शिंदे हे मौजे जानेगांव, ता. केज, जि. बीड येथील रहिवासी होते. मयत कमलाकर सुदामराव शिंदे यांची आई नामे वेणुबाई सुदामराव शिंदे व वडील सुदामराव जयवंतराव शिंदे हे पुर्वीच मयत झालेले आहेत. अर्जदारांशिवाय मयतास अन्य कोणीही कायदेशीर वारस नाहीत. मयत कमलाकर सुदामराव शिंदे यांच्या नावे **बँक ऑफ महाराष्ट्र शाखा केज येथील खाते क्रमांक ६०१२६०८३९८७ मधील रक्कम रुपये २,३२,१२१.३४/-( दोन लाख, बत्तीस हजार, एकशे एकवीस रुपये व चौतीस पैसे)**, जमा आहेत. सदर मयताच्या नावे असलेली रक्कम अर्जदारांना मिळणे आवश्यक आहे. त्यामुळे अर्जदार यांनी ते मयत कमलाकर सुदामराव शिंदे यांचे वारस असल्याचे घोषित करुन वर नमूद बँकेमध्ये जमा असणारी रक्कम मिळणेकामी प्रस्तुत अर्ज दाखल केलेला आहे.

३. अर्ज दाखल केल्यानंतर अर्जाचे जाहिर प्रगटन (निशाणी क्र.१०), दैनिक 'संकेत' आवृत्तीच्या दिनांक १७.०१.२०२६ रोजीच्या अंकात प्रसिध्द

करण्यात येवून लेखी हरकती मागविण्यात आल्या, परंतु आजपावेतो कोणाकडून हरकत प्राप्त झालेली नाही. तसेच जाहीर प्रगटन (निशाणी क्र.७) ग्रामपंचायत कार्यालय, जानेगांव, ता.केज, जि.बीड, या न्यायालयाच्या नोटीस बोर्डवर व तहसिल कार्यालय, केज येथे प्रसिध्द करण्यात आले व अर्जाबाबत कोणाला काही हरकत असेल तर त्यांनी या न्यायालयात लेखी कळविण्याविषयी सूचित करण्यात आले, परंतु आजतागायत कोणताही लेखी आक्षेप या न्यायालयास प्राप्त झालेला नाही.

४. अभिलेखावरील अर्ज, पुरावा व कागदपत्रांचा विचार करता खालील प्रश्न माझे विचाराधीन आले. त्यावर माझे कारणमिमांसेसह उत्तर खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | प्रश्न | | उत्तर |
|---|---|---|---|
| १. | अर्जदार हे त्यांनी मागणी केल्याप्रमाणे भारतीय वारस प्रमाणपत्र व त्याआधारे मयताच्या नावे जमा असलेल्या रक्कमा मिळण्यास पात्र आहेत का ? | : | होकारार्थी. |
| २. | आदेश कोणता ? | : | अर्ज मंजूर करण्यात येतो. |

**<u>प्रश्न क्र.१ करिता</u> :**

५. अर्जातील कथने शाबीत करण्यासाठी अर्जदार क्र.३ स्वप्नील पि. कमलाकर शिंदे यांनी पुराव्याचे शपथपत्र निशाणी क्र.११ येथे दाखल केलेले आहे. मयत कमलाकर सुदामराव शिंदे यांचे मृत्यू प्रमाणपत्राची पडताळणी प्रत (निशाणी क्र.५), स्वयंघोषणा वारसाचे प्रमाणपत्र, बँक ऑफ महाराष्ट्र शाखा केज यांचे खाते क्र.६०१२६०८३९८७ चे खातेपुस्तकाची पडताळणी प्रत आणि अर्जदार यांच्या आधार कार्डच्या प्रती दाखल केलेल्या आहेत. निशाणी क्र.१२ वर पुरसिस दाखल करुन अर्जदारांनी त्यांचा पुरावा बंद केला.

६. अर्जदार यांनी दिलेला तोंडी व कागदोपत्री पुरावा हा एकमेकांस पुरक असून तो अबाधीत आहे. अर्जाचे जाहिर प्रगटन दिल्यानंतरही कोणीही आक्षेप नोंदविलेला नाही. अर्जदार यांनी दिलेला तोंडी व कागदोपत्री पुरावा विना आव्हानीत राहिलेला आहे. निशाणी क्र.५ वरील मृत्यु प्रमाणपत्रावरुन कमलाकर सुदामराव शिंदे हे मयत असल्याचे दिसून येते. अर्जदार हे मयत कमलाकर सुदामराव शिंदे यांचे कायदेशिर वारस असून वर नमूद केल्याप्रमाणे मयताचे नांवे असणारी रक्कम मिळण्यास पात्र आहेत. सबब मी प्रश्न क्र.१ चे उत्तर होकारार्थी नोंदवते.

**प्रश्न क्र. २ करिताः**

७. अर्जदार हे वरीलप्रमाणे वारस प्रमाणपत्र (Succession Certificate) मिळण्यास पात्र आहेत असा निष्कर्ष मी वर उल्लेख केल्याप्रमाणे नोंदवलेला आहे. सबब अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. म्हणून प्रश्न क्र.२ करिता खालील आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. अर्जदार हे मयत **कमलाकर सुदामराव शिंदे** यांचे कायदेशिर वारस असून मयताच्या नावे **बँक ऑफ महाराष्ट्र शाखा केज येथील खाते क्रमांक ६०१२६०८३९८७ मधील रक्कम रुपये २,३२,१२१.३४/- ( दोन लाख, बत्तीस हजार, एकशे एकवीस रुपये व चौतीस पैसे)** जमा असलेली रक्कम मिळण्यास पात्र असून त्यांच्या नावे एकुण रक्कमेचा योग्य तो न्यायालयीन मुद्रांक शुल्क घेण्यात येवून तसा वारसा दाखला निर्गमीत करण्यात यावा.

Digitally signed by MANALI SHRIKANT KULKARNI
Date: 2026.03.16 16:37:43 +0530

दिनांक - १६.०३.२०२६.

**( मनाली एस. कुलकर्णी )**
दिवाणी न्यायाधीश क.स्तर, केज

CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file are word to word as per original judgment/ order.

| | | |
|---|---|---|
| Dictated on | : | 16.03.2026 |
| Transcribed on | : | --------------- |
| Checked & signed on | : | 16.03.2026 |

SD/-

(M.A.Kulkarni),
Stenographer Grade-3,
Ct. of CJJD and JMFC, Kaij.